अमृतं तु विद्या

भारतीय विद्या भवन्स,

# सरदार पटेल अभियांत्रिकी महाविद्यालय,

(शासन अनुदानित स्वायत्त संस्था)

**मुन्शी नगर, अंधेरी (पश्चिम), मुंबई - ४०० ०५८**

जावक क्र. : ३४/२०२५-२६/१६१६ दिनांक : २८.०१.२०२६

## श्रध्दांजली!

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री **श्री. अजित पवार** यांचे वयाच्या ६६ व्या वर्षी आज बुधवार, दि. २८ जानेवारी २०२६ रोजी, विमान अपघातात दुख:द निधन झालेले आहे. महाराष्ट्रातील जनतेमध्ये ते प्रेमाने **"दादा"** म्हणून ओळखले जात. त्यांचा समाजाच्या विविध घटकांवर मोठा प्रभाव होता. शेतकरी, सहकारी नेते आणि पक्ष कार्यकर्त्यांमध्ये, विशेषतः पश्चिम महाराष्ट्रात त्यांना मोठा पाठिंबा होता. श्री. पवार हे त्यांच्या **शिस्तबद्ध दिनचर्येसाठी, कामाच्या दीर्घ तासांसाठी** परिचित होते.

गेल्या तीन दशकांमध्ये श्री. पवार यांच्या विकासाच्या दृष्टिकोनाने महाराष्ट्राच्या राजकीय आणि सामाजिक परिदृश्याला आकार दिला. राज्याच्या राजकीय क्षितिजावरील एक प्रमुख व्यक्तिमत्व असलेले श्री. पवार हे सत्तेत नसतानाही महाराष्ट्रातील लोकांची सेवा करण्यासाठी आणि नियमित जनता दरबाराद्वारे त्यांच्या समस्या सोडवण्यासाठी दररोज १६-१७ तास सर्मपित करण्यासाठी ओळखले जात होते. त्यांच्या जाण्याने महाराष्ट्रची अपरिमित हानी झालेली आहे.

भारतीय विद्या भवन व सरदार पटेल अभियांत्रिकी महाविद्यालय, अंधेरी (पश्चिम) परिवारातर्फे त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली!

महाराष्ट्र शासनाने दिलेल्या निर्देशांनुसार, आज दि. २८ जानेवारी २०२६ रोजी दिवंगत उपमुख्यमंत्री श्री. अजित दादा पवार यांच्या स्मृतीस आदरांजली म्हणून सर्व शासकीय, निम शासकीय कार्यालये, शाळा व महाविद्यालये बंद ठेवण्याबाबत कळविण्यात आलेले आहे. तदनुषंगाने आज दुपारनंतर संस्थेचे कार्यालय व इतर विभाग बंद राहतील याची नोंद घ्यावी.

**(डॉ. मो. मा. मुरुडी)**
प्र. प्राचार्य
सरदार पटेल अभियांत्रिकी महाविद्यालय,
अंधेरी (पश्चिम), मुंबई – ५८.

d:\khot sir common drive data\2026\office order\marathi श्रद्धांजली ajit dada pawar.docx